**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**शनिवार, दिनांक : ७ सप्टेंबर, २०२४**

**ठळक बातम्या**

1. गणेश चतुर्थी निमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण, सार्वजनिक मंडळ आणि घरगुती गणपतींचे थाटात आगमन.
2. विद्यार्थ्यांना विविध भाषांमधून लोककथा सांगण्याचं आणि शैक्षणिक सहलीतून भारताची विविधता दाखवण्याचं पंतप्रधानांच शिक्षकांना आवाहन.
3. मॉर्गन स्टॅनले कॅपिटल इंटरनॅशनलच्या उद्योन्मुख बाजार गुंतवणूक निर्देशांकातल्या मूल्यांकनात भारताची चीनवर आघाडी.
4. नागपूर शहरातील मलजलवाहिनी आणि जलवाहिन्यांचा मास्टर प्लॉन अद्ययावत करण्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महानगरपालिकेला निर्देश.

-----------------------------

**गणेश चतुर्थी**

ढोलताशाच्या गजरात आजपासून भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर गणेशोत्सवाच्या चैतन्यमय पर्वाला सुरवात झाली आहे. लाडक्या गणपती बाप्पांच्या स्वागतासाठी राज्यभर सर्वत्र जय्यत तयारी आणि गणेशभक्तांची लगबग पाहायला मिळत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गणेशोत्सवानिमित्त आज देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा उत्सव देशाच्या अनेक भागांमध्ये सामूहिक आनंद आणि सामाजिक उर्जेचं एक सुंदर उदाहरण असल्याचं राष्ट्रपती मुर्मू यांनी म्हटलं आहे. “भारतीय परंपरेत गणेशाला शुभ आणि विघ्नहर्ता मानलं जातं. संकटांपासून सर्वांचं रक्षण व्हावं आणि समृद्धी यावी” यासाठी आपण प्रार्थना केली असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन इथे गणरायाची प्रतिष्ठापना झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर बाप्पाच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना झाली. श्री गणरायाचं आगमन आनंदाचं, समृद्धीचं पर्व घेऊन येवो, अशी सदिच्छा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. गणेशाची मनोभावे सेवा करतानाच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. तसंच पर्यावरणाची योग्य काळजी घेऊन

सणवार साजरे केले जावेत, असं आवाहनही त्यांनी केलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबई आणि नागपूर निवासस्थानीही आज गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना झाली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर निवासस्थानी आज गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गडकरी यांनी गणपती ही विद्येची देवता असून भारताला एक नॉलेज इकॉनोमी तसेच एक प्रगत राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी या विद्येच्या देवतेचे वरदान मिळो अशी सदिच्छा व्यक्त केली. बुलडाणाच्या मेहकर येथील निवासस्थानी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी गणरायाची प्रतिष्ठापना केली. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या घरी देखील आज गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

नागपूर इथं श्री गणेश मंदिर टेकडी इथल्या आराध्य गणपतीचं दर्शन घेण्यासाठी आज पहाटेपासून भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक पौराणिक श्रध्दास्थान अशी या गणेशाची ख्याती आहे. या ठिकाणी भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीनं पोलिसांनी ४० सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत तसंच चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नागपूरचा मानाचा गणपती अशी ओळख असलेल्या नागपूरच्या राजाचे दोन दिवसांपूर्वी आगमनानंतर आज राजाचे वाजत गाजत मंडपात विधिवत पूजा अर्चना करुन प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. नागपूचा राजा या गणपती स्थापनेचे हे 29 वे वर्ष असून, दर्शन करण्याकरीता भाविकांची गर्दी पहायला मिळत आहे.

अकोला शहरात आणि जिल्ह्यात पारंपरिक पद्धतीनं ढोल ताशांच्या गजरात वाजत-गाजत गणेशाचं आगमन झाले आहे.

अमरावतीमधेही गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावानं साजरा होत आहे. महानगर पालिका आणि अमरावती शहर मूर्तिकार संघटना यांनी अमरावती शहरात ७० हजार मातीच्या मूर्ती भाविकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. वाशीम जिल्ह्यातल्या २२५ गावांमध्ये एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवली जात आहे.

---------------------------

## पंतप्रधान नरेंद्र मोदी - शिक्षक संवाद

विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या महत्त्वावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भर दिला आहे. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारानं सन्मानित शिक्षकांसोबत काल नवी दिल्लीत आपल्या निवासस्थानी संवाद साधताना मोदी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिणामांवर चर्चा केली. शिक्षक विद्यार्थ्यांना स्थानिक लोककथा वेगवेगळ्या भाषांमध्ये शिकवू शकतात, जेणेकरून विद्यार्थी अनेक भाषा शिकू शकतील आणि भारताच्या सतत बदलत्या

संस्कृतीचा परिचय देखील करू शकतील असं त्यांनी सुचवलं. याप्रसंगी मोदी यांनी कोल्हापुरातील लोहिया माध्यमिक शाळेतील कलाशिक्षक सागर बगाडे यांच्याशी संवाद साधला, बगाडे यांनी पंतप्रधानांना शालेय विद्यारर्थ्यांना आपल्या संस्कृतीबाबत शिकवण्याच्या शैलीबाबत माहिती दिली.

*प्रायता ये ऐसा होता है कि बॉलिवूड हिंदी फिल्मो के व्हर्जन के तरफ चलके आते है! इसलिये मैने जब से मै यहा हूं २३ साल से मैने अपनी भारतीय संस्कृती है, लोकनृत्य और हमारे शास्त्रीय नृत्यके आधारपर ये रचना कि है मैने शिवतांडव स्तोत्र किया है! और वो भी अगणित आधारपर किया है! ३००, २०० लडको को लेके इसके विश्व विक्रम भी हुए है! छत्रपती शिवाजी महाराज के जीवनीपर भी मैने किया है वो भी विश्व विक्रम मे दर्ज हुआ था*

यावेळी पंतप्रधान म्हणाले की, शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना भारतातील विविधतेचा शोध घेण्यासाठी शैक्षणिक दौऱ्यावर घेऊन जाऊ शकतात, यामुळे त्यांच्या शिकण्यात आणि त्यांना आपल्या देशाबद्दल सर्वांगीण माहिती मिळण्यास मदत होईल. पर्यटनाला तसंच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही यातून चालना मिळेल, असंही यावेळी ते म्हणाले

----------------------------

## राष्ट्रीय पोषण माह

राष्ट्रीय पोषण माह कार्यक्रमातंर्गत आतापर्यंत १ कोटी ३७ लाख उपक्रम राबवण्यात आले आहेत. १ सप्टेंबर पासून सुरु झालेल्या राष्ट्रीय पोषण महाची सुरुवात गुजरातमधून झाली होती. या कार्यक्रमातंर्गत रक्ताची कमतरता, वाढ नियंत्रण, मोफत आहार, पोषण भी पढाई भी हे उपक्रम नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीनं राबवण्यात आले. याच कार्यक्रमामध्ये एक पेड मा के नाम या उपक्रमाचाही समावेश करण्यात आला असून देशातल्या १३ कोटी ९५ लाख अंगणवाड्याच्या परिसरात हे वृक्ष लावण्यात आले आहेत.

----------------------------

## बाल पुरस्कार

राष्टीय बाल पुरस्कारांसाठी नामांकनं पाठवण्याची मुदत या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत असून भारत सरकारच्या महिला आणि बालविकास मंत्रालयाकडून हे पुरस्कार दिले जातात. यावर्षी वीर बालदिनी म्हणजेच २६ डिसेंबर रोजी या पुरस्कारांची घोषणा करण्यात येणार आहे. या संदर्भात पाच वर्षांपेक्षा जास्त आणि १८ वर्षांखालील अर्जदारांनी भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करण्याचं आवाहन केंद्र सरकारनं केलं आहे.

----------------------------

## मॉर्गन स्टॅनले कॅपिटल

MSCI अर्थात मॉर्गन स्टॅनले कॅपिटल इंटरनॅशनलच्या EMIM अर्थात उद्योन्मुख बाजार गुंतवणूक निर्देशांकातल्या मूल्यांकनात भारतानं चीनला मागे टाकलं आहे. या निर्देशांकात भारताला २२ पूर्णांक २७ शतांश टक्के मूल्य मिळाले आहे, तर चीनची हिस्सेदारी २१ पूर्णांक ५८ शतांश टक्के आहे. गेल्या काही काळात भारतातल्या विविध शेअर बाजारात मोठी तेजी दिसून आली आहे. त्याचवेळी चीनमधले बाजार काहीशा बिकट अवस्थेत आहेत. या निर्देशांकात समावेश झाल्यानं भारतीय बाजारपेठेत ४ ते साडे ४ अब्ज डॉलरची गुंतवणूक येण्याची शक्यता आहे.

-----------------------------

## मास्टर प्लॉन

नागपूर शहराचा होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या यादृष्टीने शहरातील मलजलवाहिनी तसेच जलवाहिन्यांचा तयार असलेला मास्टर प्लॉन अद्ययावत करण्याचे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

नागपूर शहरातील विविध विषयांच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनपा मुख्यालयात काल बैठक घेतली. छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित बैठकीत शहरातील आमदार आणि मनपातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

पाणी पुरवठ्यासंदर्भातील समस्यांवर चर्चा करताना जलप्रदाय विभागाद्वारे माहिती सादर करण्यात आली. अमृत योजनेंतर्गत नागपूर शहरातील विविध भागांमध्ये ३१ टाक्यांचे काम पूर्ण झाले आहे. या क्षेत्रामध्ये जलवाहिन्यांच्या जोडणीचे काम पूर्ण करून लवकरच नागरिकांना नळाद्वारे पाणीपुरवठा केला जाणार आहे. अमृत योजनेमुळे नागपूर शहरातील टँकरने पाणी पुरवठ्या संख्या दिवसेंदिवस कमी होत असून लवकरच शहर टँकरमुक्त होईल, असा विश्वास यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी व्यक्त केला.

-----------------------------

## पॅरालिम्पिक

पॅरालिम्पिक मध्ये पुरुषांच्या क्लब थ्रो अर्थात लाठीफेकीत होकातो होतोझे सेमा याने कांस्य पदक जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. एका भुसुरुंग स्फोटातून बचावलेल्या सेमा यानं आपल्या पॅरालिम्पिक स्पर्धेतल्या आपल्या पदार्पणातच पदक जिंकल्याचा राष्ट्रपतींनी आवर्जून उल्लेख केला.

**दरम्यान, पॅरीस पॅरालिम्पिकमध्ये भारतानं आतापर्यंत २७ पदकं जिंकली आहेत. यात ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि १२ कांस्य पदकांचा समावेश आहे. भारताच्या पॅरालिम्पिकच्या इतिहासातली ही सर्वोत्तम कामगिरी आहे. सुवर्ण पदक विजेते तिरंदाज हरविंदर सिंग आणि धावपटू प्रीती पाल यांनी या एकाच पॅरालिम्पिकमध्ये दोन पदकं जिंकली आहेत. हे दोघे रविवारी होणाऱ्या समारोप समारोहात ध्वजवहन करणार आहेत.**

---------------------------

**हवामान**

**विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये आज अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे तर चंद्रपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ तसेच वाशिम जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केलाय. दरम्यान, उद्या देखील अशाच प्रकारचं पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा आहे. आज आणि उद्या विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात सतर्कतेचा यलो अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज संध्याकाळच्या सुमारास नागपुरात मध्यम स्वरूपाची वृष्टि झाली.**

---------------------------